# जबरी चोरीतील आरोपी जेरबंद

पुण्यनगरी दि. 17/06/23

**नांदेड/प्रतिनिधी**

वजिराबाद पोलीस ठाण्याच्या हद्दीत कोर्टाच्या पाठीमागे दुचाकी स्वाराचा १३ हजार रुपयांचा ऐवज चोरट्यांनी लंपास केला होता. स्थागशाच्या पथकाने या गुन्ह्यातील एका आरोपीला जेरबंद केले आहे.

शहर व परिसरात जबरी चोऱ्यांचे प्रकार वाढले आहेत. वजिराबाद पोलीस ठाण्याच्या हद्दीत कोर्टाच्या पाठीमागील रोडवर एका चोरट्याने दुचाकीस्वाराला लिफ्ट मागून फिर्यादीच्या गाडीवर बसून रस्त्यात त्याची दुचाकी थांबविली. त्यानंतर त्याने दुचाकी चालकाला मारहाण करुन त्याच्या जवळील ५ हजार रुपयांची रोकड व ८ हजार रुपयांचा मोबाईल असा एकुण १३ हजारांचा ऐवज जबरदस्तीने पळविला. या प्रकरणी वजिराबाद पोलीस ठाण्यात १५०/२३ नुसार गुन्हा नोंदविण्यात आला आहे.स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकातील अधिकाऱ्यांना याबाबत मिळालेल्या गुप्त माहितीनंतर आरोपी **(पान ४ वर...)**